Gmail

Pramod Puri <puriakl@gmail.com>

# महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, 1961

1 message

**CHANDRAKANT WADE** <rakavi2-phd@mah.gov.in> Thu, Feb 6, 2025 at 12:50 PM
To: puriakl <puriakl@gmail.com>

महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, 1961 मधील नियम-2 (2) (क) मध्ये, “एक वर्षापेक्षा कमी नसलेली सेवा झालेले व मासिक दराने वेतन घेणारे कार्यव्ययी आस्थापनेवर नेमलेले कर्मचारी यांचा समावेश होतो.” महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे सरळसेवेने अथवा शासनाने अनुकंपा तत्वावर नियुक्त केलेले कर्मचारी हे शासनाने पुर्णवेळ तत्वावर नियुक्त केलेले कर्मचारी असून ते महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 मधील नियम 2 (2) (क) मध्ये मोडत नाहीत, त्यामुळे त्यांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 मधील नियम २ (२) नुसार सेवेच्या एका वर्षाचे आत वैद्यकिय प्रतिपुर्ती अनुज्ञेय ठरते.
सदर नियमांस अनुसरुन कार्यवाही करण्यामध्ये संभ्रम निर्माण होत असल्यास संबंधित आस्थापनेने वरीष्ठ कार्यालयाचे वा सार्वजनिक आरोग्य विभागाचे रितसर मार्गदर्शन प्राप्त करुन प्रकरणावर निर्णय घेणे अपेक्षित आहे.